VOL- VII | ISSUE- V | MAY | 2020 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 6.293 | ISSN 2349-638x

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि ओ.बी.सी. प्रवर्गातील लोकांसाठी घटनात्मक तरतुदी

**प्रा.डॉ.एस.के.खडसे**
राज्यशास्त्र विभागप्रमुख
कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज इस्लामपूर

**Abstract.:-**

*भारताच्या हिंदू चातुवर्ण्य पध्दतीमध्ये ब्राम्हण क्षेत्रीय, वैश्य व शुद्र या वर्णापैकी शुद्र वर्णातील बारा बलुतेदार व अलुतेदार समाज म्हणजे घटनात्मक दृष्टीने आता इतर मागास प्रवर्ग (other Backward classes) असे म्हणतो. हा समाज जातीप्रमाणे पारंपारिक व्यवसाय करीत असल्याने वरच्या प्रस्तापित जातीच्या वर्चस्वाखाली जगणारा समाज होता. प्राचीन काळापासुन या विस्कळीत असंघटीत समाज असल्याने राजकिय जागृतीची जाणीव नसलेला मागास प्रवर्गातील हा समाज. हया मागास प्रवर्गातील समाजाला आपल्या जातीचा अहंकार होता कारण भारतीय समाजातील जाती व्यवस्थेत हा अस्पृश्यापेक्षा उच्च असल्याने व मनुवादी व्यवस्थेत हया व्यवसायिक जाती (बलुतेदार) मुळे जातीच्या परिघाबाहेर येण्याचा प्रयत्न कधीही केलेला नाही. मात्र त्यामुळे वरच्या प्रस्थापित सरंजामदार, जमीनदार वर्गाकिडुन या मागासप्रवर्गाचे सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि राजकीय शोषण केले गेले मात्र हया बलुतेदार मागास जाती प्रस्थापित जमीनदार जातीच्या आज्ञापालनातच धन्यता मानुन त्यांची सेवा करून बलुतं घेत राहीला.. मात्र त्यांच्या प्रगतीसाठी सर्वप्रथम ब्रिटीश सरकारने मद्रास प्रांतामध्ये १८८५ मध्ये मागास जातीच्या विद्यार्थ्यासाठी शैक्षणिक सोयी सुविधा देण्यासाठी कायदा केला. विशेषत: म.फुले यांनी मागास जातीच्या मुलांना शिक्षण मिळावे, त्यांना विशेष सवलती मिळाव्यात अशी मागणी इंग्रज सरकारकडे केली होती. कोल्हापूर संस्थानामध्ये राजर्षी शाहु महाराजांनी आपल्या प्रशासनात व शिक्षणामध्ये मागास जातीसाठी १९०२ मध्ये पन्नास टक्के आरक्षणाची तरतुद केली.*

*बडोदा संस्थानामध्येही महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी मागास जातीसाठी नोकरी, शिक्षणासाठी योजना राबविल्या व परदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती सुरू केली व अनेक मागास जातीच्या मुलांना आपल्या संस्थानामध्ये नोकरी दिल्या हे त्यांच्या पत्रसंग्रह खंडातुन विषद केले डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारताची राज्यघटना लिहीत असताना संपूर्ण भारतातील जातीय व्यवस्थेचा व समाज व्यवस्थेचा सखोल अभ्यास असल्यामुळे संविधानामध्ये इतर मागास जातीच्या सर्वांगीन विकासासाठी कलम ३४० मध्ये तरतुद केली की मागास प्रवर्गाच्या विकासासाठी राष्ट्रपती आयोग स्थापन करील आणि मागास प्रवर्ग आयोग संपूर्ण मागास जातीचा विविध अंगानी अभ्यास करून त्यांच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, आर्थिक व राजकीय विकासासाठी केंद्र सरकारला शिफारस करेल व त्यांच्या शिफारशी स्विकारून सरकार मागास प्रवर्गाच्या विकासासाठी योजना व विविध सवलती देईल अशी तरतुद डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केली होती. मात्र तत्कालीन कॉग्रेसच्या नेहरू सरकारने ओबीसीसाठी मागास प्रवर्ग आयोग स्थापना केला नाही त्यामुळे केवळ मागासप्रवर्गाच्यासाठी १९५१ मध्ये नेहरू सरकारवर नाराज होवून आपल्या कायदेमंत्री पदाचा राजीनामा दिला. खरंतर आज ओबीसी नेते समाजासाठी कोणत्याही पदाचा आजपर्यंत राजीनामा दिला असे आढळलेले नाही.*

## प्रस्तावना

भारताच्या हिंदू चातुवर्ण्य पध्दतीमध्ये ब्राम्हण क्षेत्रीय, वैश्य व शुद्र या वर्णापैकी शुद्र वर्णातील बारा बलुतेदार व अलुतेदार समाज म्हणजे घटनात्मक दृष्टीने आता इतर मागास प्रवर्ग (other Backward classes) असे म्हणतो. हा समाज जातीप्रमाणे पारंपारिक व्यवसाय करीत असल्याने वरच्या प्रस्तापित जातीच्या वर्चस्वाखाली जगणारा समाज होता. प्राचीन काळापासुन या विस्कळीत असंघटीत समाज असल्याने राजकिय जागृतीची जाणीव नसलेला मागास प्रवर्गातील हा समाज. हया मागास प्रवर्गातील समाजाला आपल्या जातीचा अहंकार होता कारण भारतीय समाजातील जाती

व्यवस्थेत हा अस्पृश्यापेक्षा उच्च असल्याने व मनुवादी व्यवस्थेत हया व्यवसायिक जाती (बलुतेदार) मुळे जातीच्या परिघाबाहेर येण्याचा प्रयत्न कधीही केलेला नाही. मात्र त्यामुळे वरच्या प्रस्थापित सरंजामदार, जमीनदार वर्गाकडुन या मागासप्रवर्गाचे सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि राजकीय शोषण केले गेले मात्र हया बलुतेदार मागास जाती प्रस्थापित जमीनदार जातीच्या आज्ञापालनातच धन्यता मानुन त्यांची सेवा करून बलुतं घेत राहीला. मात्र त्यांच्या प्रगतीसाठी सर्वप्रथम ब्रिटीश सरकारने मद्रास प्रांतामध्ये १८८५ मध्ये मागास जातीच्या विद्यार्थ्यासाठी शैक्षणिक सोयी सुविधा देण्यासाठी कायदा केला. विशेषत: म. फुले यांनी मागास जातीच्या मुलांना शिक्षण मिळावे, त्यांना विशेष सवलती मिळाव्यात अशी मागणी इंग्रज सरकारकडे केली होती. कोल्हापूर संस्थानामध्ये राजर्षी शाहु महाराजांनी आपल्या प्रशासनात व शिक्षणामध्ये मागास जातीसाठी १९०२ मध्ये पन्नास टक्के आरक्षणाची तरतुद केली.

बडोदा संस्थानामध्येही महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी मागास जातीसाठी नोकरी, शिक्षणासाठी योजना राबविल्या व परदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती सुरू केली व अनेक मागास जातीच्या मुलांना आपल्या संस्थानामध्ये नोकरी दिल्या हे त्यांच्या पत्रसंग्रह खंडातुन विषद केले आहे. मात्र स्वातंत्र्यानंतर केंद्र सरकारला मात्र जाणीवपूर्वक या मागास जातीच्या कल्याणाकडे शैक्षणिक सवलतीकडे व नोक—यातील आरक्षणाकडे दुर्लक्षण केले.[१]

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि ओबीसीसाठी तरतुदी**

डॉ.बाबासाहेब आंबेडकराच्या भारताच्या जातीय व्यवस्थेचा खुप खोलवर अभ्यास होता. बाबासाहेब आंबेडकरांनी sources and origin & Indian caste, Annihilation of caste असे महत्वपूर्ण व भारतातील जातीय व्यवस्थेवर सर्व अंगानी प्रकाश टाकणारे ग्रंथ लिहिले. त्यामुळे बाबासाहेब आंबेडकरांनी जातीव्यवस्था नष्ट करण्यासाठी काही मार्गही सांगीतले, योजना आखली मात्र जी जातीव्यवस्था समाजाला घातक आहे भारताचे नुकसान करणारी आहे, ती मात्र आजही मजबुत होत आहे. भारतातील वरच्या प्रस्थापीत जाती व खालच्या जातीही जात नष्ट करायला तयार नाहीत. या जातीव्यवस्थेत शुद्र व अतिशुद्राचे शोषण खुप मोठया अस्पृश्याना तर कोणत्याच प्रकारचे अधिकार, स्वातंत्र्य दिलेले नव्हते. त्यांना जनावरापेक्षाही हिन प्रकारची वागणुक दिली जात होती, शुद्रा मधील बलुतेदार व अठरा पगड जातींना जातीनुसार व्यवसाय असल्याने त्यांना समाजात अस्पृश्यापेक्षा थोडा वरचा मान होता त्यामुळे त्यांच्या अन्याय व शोषणाविरूध्द जाणीव जागृती निर्माण झाली नाही.[२]

**डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे इतर मागास जातीच्या विकासासाठी कार्य :—**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारताची राज्यघटना लिहीत असताना संपूर्ण भारतातील जातीय व्यवस्थेचा व समाज व्यवस्थेचा सखोल अभ्यास असल्यामुळे संविधानामध्ये इतर मागास जातीच्या सर्वागीन विकासासाठी कलम ३४०मध्ये तरतुद केली की मागास प्रवर्गाच्या विकासासाठी राष्ट्रपती आयोग स्थापन करील आणि मागास प्रवर्ग आयोग संपूर्ण मागास जातीचा विविध अंगानी अभ्यास करून त्यांच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, आर्थिक व राजकीय विकासासाठी केंद्र सरकारला शिफारस करेल व त्यांच्या शिफारशी स्विकारून सरकार मागास प्रवर्गाच्या विकासासाठी योजना व विविध सवलती देईल अशी तरतुद डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केली होती. मात्र तत्कालीन कॉग्रेसच्या नेहरू सरकारने ओबीसीसाठी मागास प्रवर्ग आयोग स्थापना केला नाही त्यामुळे केवळ मागासप्रवर्गाच्यासाठी १९५१ मध्ये नेहरू सरकारवर नाराज होवून

आपल्या कायदेमंत्री पदाचा राजीनामा दिला. खरंतर आज ओबीसी नेते समाजासाठी कोणत्याही पदाचा आजपर्यंत राजीनामा दिला असे आढळलेले नाही.[३]

Kew Words:-

१) **ओ.बी.सी ऑदर बॅक वर्ड कास्ट**

चातुवर्ण्य व्यवस्थेत ब्राम्हण, क्षेत्रीय , वैश्य आणि शुद्र यामध्ये शुद्रामध्ये उच्च जाती, बाराबलुतेदार व अठरा पगड जातीला व भटक्या जातीला इतर मागास प्रवर्ग ओ.बी.सी असा घटनात्मक शब्द आहे.

२) **भटक्या जाती** : जाती व्यवस्थेत हया भटकंती करून राहणा—या जाती घटनात्मक NT, VJNT असे म्हटले जाते

३) **दलित जाती** :

भारतीय समाज व्यवस्थेत सर्वात कनिष्ठ स्तरातील जाती ज्यांना आपण एस.सी. अनुसूचित जाती म्हणतो ज्या गावगाडयामध्ये गावकुसाबाहेर होत्या व आजही गावकुसाबाहेर आहेत.

४) **मागासवर्ग आयोग:**

राज्यघटनेमध्ये राष्ट्रपतीनी मागासवर्गाच्या हित रक्षण व विकासासाठी स्वतंत्रपणे आयोग स्थापन करावा अशी तरतुद केलेली आहे.

५) **प्रस्थापित जाती** :

भारतीय जाती व्यवस्थेत ज्या जातीकडे संपूर्ण समाजाची सामाजिक राजकीय, सांस्कृतिक आर्थिक स्वरूपाची आधिसत्ता असते ज्यांच्या वर्चस्वखाली इतर सर्व SC, ST, OBC हया प्रवर्गातील जाती राहत असत म्हणजे त्या जाती समाजात प्रभावशाली व जमीनीची मालकी असणा—या श्रीमंत वरच्या जाती.

**मागास प्रवर्गातील लोकांसाठी मुलभूत हक्काची तरतुद :**

भारतीय राज्यघटनेतील तिस—या विभागातील कलम १२ ते ३५ मधील मुलभुत अधिकार इतर मागासप्रवर्ग भटक्या जाती जमातींना देखील प्रदान झाले डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी समतेचा हक्क, स्वातंत्र्याचा, शिक्षणाचा, शोषणाविरूध्दचा हक्क, धर्म स्वातंत्र्याचा, संघटना, मालमत्तेचा, आपली भाषा लिपी व संस्कृती जोपासण्याचा अधिकार प्रदान केला. तसेच सर्वांगीन विकासासाठी आवश्यक असणा—या मुलभुत अधिकाराचा कोणी भंग करीत असेल तर न्यायालयात दाद मागण्यासाठी राज्यघटनेतील कलम ३२ मध्ये तरतुद केली.[४] आज त्यामुळे मागास प्रवर्गातील लोकांनी वेगवेगळया संघटना, राजकीय पक्ष स्थापन केली आणि राजकारणात सक्रीय प्रवेश करीत आहेत तर समतेमुळे इतर लोकांच्या प्रमाणे व्यवसाय, उद्योगधंदे व प्रशासनात नोकरी करीत आहेत आणि धर्म स्वातंत्र्यामुळे अनेकांनी आपल्याला पाहिजे त्या धर्माचा स्विकार करून चांगले स्वाभिमानाने जीवन जगत असुन शिक्षणाच्या अधिकारामुळे शिक्षण घेत असुन आपला सर्वागींन विकास करीत आहेत. म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान सभेत विरोध असतानाही इतर मागास प्रवर्ग भटक्या जाती जमातीसाठी घटनात्मक तरतुदी भारतीय राज्यघटनेत केल्या.

आजही इतर मागास प्रवर्गातील लोकांना भटक्या जाती जमातीच्या लोकांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर आपले वाटत नाहीत. कारण गेल्या हजारो वर्षापासुन प्रस्थापीत जातीच्या, जमीनदाराच्या प्रभावाखाली राहण्याची सवय लागली आहे. आपल्या वेगवेगळया जातीच्या देव देवता, अनिष्ट प्रथा परंपरा यामध्ये हा मागास प्रवर्ग गुंतलेला आहे. तो वरच्या जातीच्या वर्चस्वाखाली दडपलेलाच आहे. डॉ. पंजाबराव देशमुख म्हणाले की बाबासाहेब तुम्ही आमच्या मागास प्रवर्गासाठी व मराठा कुणबीसाठी काही केले नाही तेव्हा बाबासाहेब आंबेडकरांनी तरतुदी विषयी व राष्ट्रपतीनी मागास प्रवर्ग आयोगाची स्थापना करून मागास प्रवर्गाच्या जातीचा सर्वे करून त्यांच्या सर्वांगीन

विकासासाठी, शैक्षणिक सवलती व नोक—यामध्ये राखीव जागा ठेवण्याठी शिफारस करावी. त्या सरकारने शिफारशी स्विकारून योजना राबवाव्यात अशी तरतुदीची माहिती दिली. तेव्हा डॉ.पंजाबराव देशमुख म्हणाले, की बाबासाहेब तुम्ही केवळ दलितांचे नेते नाहीत तर सर्व भारतीयाचे विशेषत: इतर मागासप्रवर्गाचेही नेते आहेत.[५]

**इतर मागास प्रवर्गाना नेतृत्व नाही:**

इतर मागास प्रवर्ग व भटक्या जाती जमातीसाठी करण्यात आलेली घटनेत तरतुदी त्यानुसार या मागास जातीच्या लोकांना मिळालेल्या सोयी, सवलती व विकासाच्या योजना त्यामुळे त्यांचा झालेला विकास यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केलेले घटनात्मक प्रयत्न हे सांगण्यासाठी तेव्हा पंजाबराव देशमुख होते.[६] मात्र आज ओबीसी व भटक्या जातीना प्रभावी, अभ्यासू नेता नाही. त्यामुळे ओबीसी (मागास) प्रवर्गाचे लोक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आपले नेते भाग्य विधाते ओबीसी चे कैवारी मानायला तयार नाहीत कारण त्यांच्यात सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक राजकीय जाणीव जागृती म्हणावी तेवढी प्रस्थापित जाती व जमीनदारांनी होवू दिलेली नाही, त्यामुळे आजही स्वातंत्र्यानंतर ७० वर्षाच्या काळातही ओबीसी व भटक्या जाती दलिताच्या कधी जवळ आलया नाहीत. मात्र दलित समाज मात्र ज्या ज्या वेळी ओबीसी व भटक्या जाती जमातीवर अन्याय अत्याचार झाला त्यावेळी रस्त्यावर उतरलेला दिसून येतो कारण डॉ.बाबासाहेब आंबेडकर त्यांना समजले, त्यांनी स्वीकारले व त्यांच्या विचाराचे अनुकरण केले. त्यामुळे दलित समाजात ब्राम्हण समाजाप्रमाणे शैक्षणिक प्रगती, सांस्कृतिक प्रगती, राजकीय जागृती आणि स्वाभिमानी प्रवृत्ती निर्माण झाली आहे.

दलित लोकांच्या वैचारिक प्रगतीमागे गौतम बुध्दांची विचारप्रणाली, तत्वज्ञान, वैज्ञानिक दृष्टीकरण, सम्राट अशोक, कबीर, छत्रपती शिवाजी महाराज, म.फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे यांचे विचार त्यांनी स्विकारले व दलितांनी आपल्या जगण्याचा मार्ग या महापुरूषाच्या मार्गाने निवडला. त्यामुळेच इतरापेक्षा दलित समाज वैचारिक हा महापुरूषाचा वारसा असणारा असल्यामुळे त्यांची वैचारिक प्रगती झाली.

म.फुले यांनी मांडलेला हा विचार म्हणजे आपल्या सर्व शुद्र जातीना जागृत करण्यासाठी त्यांना झोपेतुन जागे करून जाणीव करून देण्यासाठी मंत्र दिला होता. मात्र आपण आजही शुद्र म्हणजे दलित जाती असा समज करतो. मात्र जे ब्राम्हण नाही, क्षेत्रीय व वैश्य नाही त्या सर्व शुद्र जाती. त्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराज राजर्षी शाहु महाराज सुध्दा यामधून सुटले नव्हते. म.फुले म्हणतता यांनी या मंत्रातून मनुस्मृतीने व ब्राम्हणी व्यवस्थेने चातुवर्ण्य पध्दतीमध्ये शुद्राना शिक्षण्याचा अधिकार नाकारला होता. शुद्रांनी फक्त सेवा करावी, मनुस्मृती ने सर्व शुद्रांनी सेवा धर्म पाळावा, जातीनुसार दिलेली कामे करावीत असे म्हटलेले आहे. मात्र म.फुले यांनी शिक्षणाचे विद्येचे महत्व पटवून देण्याचा प्रयत्न केला. एका अविद्येने शुद्राची किती नुकसान झाली हे सांगण्यासाठी हा मंत्र त्यांनी दिला आणि सार्वजनिक सत्यधर्म आपल्या सर्व शुद्रांना दिला परंतु आम्ही या सार्वजनिक सत्यधर्माकडे दुर्लक्ष केले किंबहुना म.फुलेना बहिस्कृत केले. कर्मवीरांनी शिक्षणाचे महत्व पटवून देण्यासाठी व प्रत्येक्षात शुद्रांना शिक्षण देण्यासाठी सातारा येथे रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. मात्र बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या सर्व इतर मागास प्रवर्गासाठी व भटक्या जाती जमातीसाठी जे काम केले ते विसरता येणे अशक्य आहे.

डॉ.बाबासाहेबांनी इतर मागास प्रवर्ग म्हणजे ओबीसीसाठी राष्ट्रपतीनी आयोग स्थापन

करावा अशी तरतुद केली. तरीही नेहरू सरकार आयोग स्थापन करण्यास उदासिन होते त्यासाठी बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या कायदेमंत्री पदाचा राजीनामा दिला. यांचा अर्थ भारताचे पंतप्रधान मा.पंडीत नेहरू यांनी इतर मागास व भटक्या जातीच्या हिताचा विचार करण्यासापेक्षा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा राजीनामा स्विकारला मात्र याच वेळी संसदेत व मंत्री मंडळात ओबीसीचे नेते मात्र काही बोलले नाहीत.[७]

कॉंग्रेसने ओबीसी व भटक्या जाती जमातीचे कल्याण करण्यापेक्षा त्यांच्या वेगवेगळया जातीचे नेते उभे केले. त्यांच्यात एकजुट कधीच होणार नाही यांची काळजी घेतली. नंतरच्या काळात कॉंग्रेसने, भाजपने, शिवसेनेने आणि राष्ट्रवादीने ओबीसीच्या व भटक्या जातीच्या नेत्यांना कधीच एकत्र येऊ दिलेले नाही. मा.छगन भुजबळ, मा.गोपीनाथराव मुंडे, मा.एकनाथराव खडसे, मा.श्रावण देवरे मा. हनुंतराव उपरे काका हे महाराष्ट्रातील नेते राष्ट्रीय स्तरावर ओबीसी नेत्यांना एकत्र करण्यासाठी एक ओबीसी परिषद घेतली मात्र नंतर प्रस्थापित राजकिय पक्षानी या नेत्यांना लक्ष्मण मानेसहीत एकटे पाडण्याचा प्रयत्न केला आहे.

**काका कालेलकर आयोग :**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या घटनात्मक तरतुदीमुळे व त्यांच्या आग्रहामुळे पं. नेहरू सरकारने गांधीवादी नेते काका कालेलकर मागासवर्ग आयोग स्थापन केला. मात्र तत्कालीन कॉंग्रेसप्रणीत नेहरू सरकारने शिफारशी स्विकारल्या नाहीत त्यांनतर १९७८ मध्ये जनता पक्षाच्या मोरारजी सरकारने न्या.बी.पी.मंडल यांचे अध्यक्षतेखाली ओबीसीसाठी मंडल आयोग स्थापन झाला. त्यांनी संपूर्ण भारतातील ओबीसी व भटक्या जाती जमातीचा सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकिय , औद्योगिक परिस्थितीचा अभ्यास करून त्यांच्या हितासाठी केंद्र सरकारला शिफारशी सादर केल्या. परंतु पुन्हा १९८० ला इंदिरा गांधी यांचे सरकार केंद्रात आले त्या शिफारशीची अंमलबजावणी केली नाहीं. म्हणजे कॉंग्रेस पक्षाने ओबीसी व भटक्या जातीच्या हिताकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले मात्र या काळात मंडल आयोग हा दलितासाठी आहे असा गैरसमज करून दलिताच्या आणि डॉ. बाबासाहेबाच्या विरोधात ओबीसी व भटक्या जाती जमातीचे लोक रस्त्यावर आलें. यावेळी दलित चळवळीनी मंडल आयोगाची तात्काळ अंमलबजावणी करा यासाठी आंदोलने, जाळपोळ केली खरं तर यावेळी दलितावर प्रस्थापित ओबीसीच्या नेत्यांनी विरोध करून मंडल आयोगालाच विरोध केला १९८९ मध्ये तत्कालित पंतप्रधान मा.व्हि.पी.सिंग यांनी मंडल आयोगाची अंमलबजावणी करण्यासाठी घोषणा केल्यानंतर भाजपने जनता दलाचा पाठींबा काढून घेतला. व्ही.पी.सिंग यांचे सरकार कोसळले यांचा अर्थ ओबीसी नेत्यांना अजुनही कळाला नाही की भाजप सुध्दा ओबीसीच्या विरोधात तेव्हाही होता आणि आजही आहे.

आजही कॉंग्रेस राष्ट्रवादी भाजप व शिवसेना वेगवेगळया जातीच्या नेत्यांना मतासाठी उभे करतात. आपले जाहीरनामे पुर्ण करतात मात्र आजही शेकडो ओबीसी व भटक्या जातीची अवस्था अतिशय वाईट आहे. काही जाती तर भटक्या अवस्थेत आहेत काही आजही मागून आपली उपजिवीका करीत आहेत. कोणत्याही प्रस्थापित राजकिय पक्षाला या जातीच्या लोकांचे अवस्था पाहून कधीही वाईट वाटले नाही किंवा या जातीजमातीसाठी त्यांना घरे देवून, शेती देवून त्यांना रोजगार देवून त्यांच्या विकासासाठी कधीही जाणीवपूर्वक काळजीही केलेली नाही. तरीही ओबीसी नेते प्रस्थापित राजकिय पक्षात आंनदाने काम करून स्वत:चा स्वार्थ साधत आहेत. मात्र तेही ओबीसी व भटक्या जातीसाठी काहीही करीत नसल्याचे दिसून आले आहे. प्रस्थापित राजकिय पक्षाच्या नेतृत्वाच्या प्रभावाखाली पदे मिळतात आणि हे त्या ओबीसी व भटक्या जातीची लोकसंख्या

५२ टक्के असुनही हे ३७४३ जाती या मागास प्रवर्गात समाविष्ट आहेत. हे मंडल आयोगाच्या शिफारशीत म्हटले असून त्यांना नोक—यातील राखीव जागा शिक्षणामध्ये सवलती, उद्योग व्यवसायासाठी आर्थिक मदत इत्यादीसह अनेक शिफारशी करून याची अंमलबजावणी व्यवस्थीत झाली की नाही हा दर २० वर्षानी आढावा घ्यावा असे मंडल आयोगात म्हटले आहे. १९८० ते १९९० या काळात धुळ खात हा अहवाल पडला मात्र कॉग्रेस मधील एकही ओबीसी नेता यावर इंदिरा गांधी किंवा राजीव गांधीला काहीही बोलले नाही नंतर व्हि.पी.सिंग जनता दलाचे सरकार असताना मंडल आयोग अंमलबजावणी निर्णय घेतला. मात्र आजही या आयोगाच्या सर्व शिफारशीची अमंलबजावणी झालेली नाही.

**निष्कर्ष :**

भारतातील एवढया मोठया इतर मागास प्रवर्ग व भटक्या जाती जमातीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांच्या सर्वांगीन विकासासाठी घटनात्मक तरतुदी केल्या. ब—याच जातींना गुन्हेगार जाती ठरविले होते. त्यांची मुक्तता करणारा कायदा करून सर्वांना मुलभूत हक्क, स्वातंत्र्य बहाल केले, त्यांच्यासाठी आयोगाची तरतुद केली आहे. त्यांना शैक्षणिक सवलती, रोजगार नोक—यात आरक्षणाची तरतुद केली आणि त्यांच्या सर्वागीन विकासासाठी प्रयत्न केले परंतू प्रस्थापित कॉग्रेस, भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी या राजकीय पक्षांनी त्यांच्या नेत्यास पदे देवून आपली फक्त मतदार बॅक मजबुज करून त्यांच्यात एकजुट होवु दिली नाही आणि त्यांच्यासाठी सोयी सवलती जाहीर करून क्रिमिलेअरची अट टाकुन विकासाला खिळ घालण्याचा प्रयत्नही केला. कारण त्यांची प्रगती झाली तर ते आपल्या बरोबरीने येतील म्हणून त्या मागास जातीच राहतील यांची पुरेशी काळजी घेतली. आज शेकडो ओ.बी.सी. व भटक्या जाती जमाती घटनात्मक तरतुदी असतानाही, शिक्षणात सवलती, शिष्यवृत्ती, नोकरीत राखीव जागा असातनाही या विकासाच्या परिघा बाहेर आहेत. मात्र ओबीसीचे खोटे दाखले काढून ओबीसी व भटक्याचे आरक्षण, सोयी सवलती लाटण्याचा उद्योग सर्रास चालू आहे. त्यामुळे ओबीसी व भटक्यांची एकजुट होवून छत्रपती शिवाजीमहाराज, म.फुले, राजर्षी शाहू महराज, कर्मवीर भाऊराव पाटील डॉ.बाबासाहेब आंबेडकर, संत गाडगे महाराज, व संत तुकडोजी महाराज यांच्या विचार धारेच्या दिशेने या मागास जातीने जाण्याचा प्रयत्न केला व घटनात्मक मार्गाचा वापर केला तर नक्कीच हा समाज प्रगती करेल यात शंका नाही.

आज प्रस्थापित राजकिय पक्षातील काही ओबीसीचे नेते ओबीसी व भटक्या जातीसाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या घटना समितीत संघर्ष आणि त्यांनी केलेल्या घटनात्मक तरतुदी याविषयी जागृत होत आहे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर म.फुले, राजर्षी शाहु महाराज यांच्या विचाराला समोर ठेवून समाजाला संघटीत करीत आहेत. जर अशा निस्वार्थी ओबीसी नेत्यांना समाजानी साथ दिली तर नक्की ओबीसी राजकर्ती जमात होईल, सत्ताधारी बनेल आणि घटनात्मक मार्गाने आपले सर्व प्रश्न सोडविल यात शंका नाही.

## संदर्भ

१)डॉ.लुलेकर प्रल्हाद, दलितेतरांसाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर अनंत पैलुचा सामाजिक योध्दा, सायन पब्लिकेशन पुणे.

२)संपा. रत्नाकर गणपवीर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर लेखन व भाषणे, खंड. १८

३)डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे अग्रलेख बहिस्कृत भारत.

४)भारताचे संविधान, महाराष्ट्र शासन प्रकाशन.

५)खैरमोडे चांगदेव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र खंड. २

६)शुद्र पुर्वी कोन होते, डॉ.बाबासाहेब आंबेडकर.

७)डॉ.लुलेकर प्रल्हाद, दलित्तेतर डॉ.बाबासाहेब आंबेडकर भाषण. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीमहोत्सव शिवाजी विद्यापीठ व्याख्यानमाला.